म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १८६४५

REFBK-0016307
REFBK-0016307


पाऊलखुणा
वि. म. कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४१९९२ वि: वाङ्मय
क्रमांक १७०५ नों दि: १५/८/८७

# पाऊलखुणा

[ काव्य संग्रह ]

REFBK-0016307
REFBK-0016307

वि. म. कुलकर्णी

दा. क्र. १६३०७

रु. ५.००

व्हीनस प्रकाशन : पुणे

पहिली आवृत्ती
ऑगस्ट १९६७

★

© वि. म. कुलकर्णी

★

मुखपृष्ठ : अनंत सालकर
ब्लॉक्स : धारगळकर प्रोसेस प्रा. लि. मुंबई

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
हीनस प्रकाशन
तपश्चर्या’
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

★

मुद्रक :
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पेठ : पुणे २

आधुनिक मराठी काव्याचे उद्‌गाते

कविश्रेष्ठ केशवसुत

यांना

‘ तुझ्या दिव्यत्वापुढे जग भिकारी ! ’

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नों. दि. ....................

## प्र स्ता व ना

प्रा. वि. म. कुलकर्णी यांच्या कवितांच्या ह्या संग्रहाला आजवरच्या त्यांच्या कविता हीच पुरेशी प्रस्तावना आहे. साधे विषय, निसटते क्षण, हळुवार भाव या साऱ्यांना काही नवा आशय देण्यात त्यांचे मन रमते. ‘ घर, देव आणि गगन ’ ही कविता घ्या :

‘ घर छोटेसे
असे तसे...
चार भिंतींचे, आडोशाचे,
गज असलेल्या खिडकीचे
खिडकीवरील पडद्यांचे... ’

असे ' आमचे आम्हा एक घर लागते ' पण हे घर पुरत नाही. घराबाहेर चाकरीसाठी जावे लागते. आणि चाकरीच्या चाकोरीत अडकण्यापूर्वी ' दोन्ही कर ' जोडण्यापुरता एक ' नटलेला सजलेला ' सगुण देव लागतो. येथे कवीचे निरीक्षण संपते. रोज जे प्रत्यक्ष दिसते ते एवढेच असते. पण त्याची कविता पुढे चालू राहते. घर आणि सगुण देव या पृथ्वीवरच्या, आम्हाला लागणाऱ्या म्हणून आम्हीच दगडविटांनी किंवा संगमरवरातून नाजुकपणे कोरलेल्या, वस्तू आहेत. पण आमचे मन केवळ त्यांच्या आसऱ्याने विसावत नाही. म्हणून आम्हाला ' गगन 'ही हवेसे वाटते. हे गगन ' चंद्रसूर्याच्या दोन नेत्रांनी ' साऱ्या त्रिभुवनावर मायापाखर घालते. ते ' शुचिर्भूत ' आहे, आणि ' अपराधी मनांना आमच्या अर्ध्या रात्री कुरवाळणारे ' आहे. या गगनाला कवीने ' त्रिभुवनाचे छत्र ' म्हणून अतीताचे असीमपण दिले आहे; पण शेवटी कवी म्हणतो :

**' आमचे आम्हा एक गगन लागते ! '**

आमचे आम्हा ' घर ' लागते, ' देव लागतो व गगनही लागते ! ' गजांच्या खिडकीपासून कवीचे मन विस्तारत जाते ते ' तारकांसोबत जागणाऱ्या ' या गगनापर्यंत ! पण " आमचे आम्हा " हे सारे हवे, हे कवितेचे पालुपद एक ताल देत राहते.

हा जो ताल आहे, जो एक लय आहे, तो या कवीच्या स्थायी वृत्तीची खूण वाटते. नरनिर्मित जीवनाची जडता, ओंगळपणा व मठ्ठ निर्घृणता पाहून केशवसुतांचे हृदय उलले, फाटून गेले; त्यांचे मन बंड करून उठले. या जगापलीकडची एक सौंदर्यघन, प्रकाशमय, चिरतरुण सृष्टी त्यांना दिसली. त्या सृष्टीचा प्रकाश या घनतमिस्राच्या जगात आणून येथेच स्वर्ग समक्ष करता येईल, अशी दुर्दम्य आशा त्यांनी बाळगली. ' शैशवा 'ला स्वर्ग सन्निध असतो, त्या अर्थी असे म्हणता येईल की, आधुनिक मराठी कवितेच्या त्या शैशवकाळात केशवसुतांनी प्रेषिताच्या निरागसतेने स्वर्गसमक्षतेचा तो संदेश दिला. पण तो काळ व

त्या वेळचा तो आशावाद आजच्या कवींना जवळचा वाटू शकत नाही. एक 'प्रौढत्व' आता आले आहे. या प्रौढत्वाची जाणीव कृत्रिम नाही. ती जाणीव खोलच आहे. तिच्यातूनच मर्ढेकरांची वैफल्यवृत्ती व 'उगीचता' निर्माण झाली. पण इतर काही कवींनी जीवनाबद्दल एक 'स्वीकारा'ची वृत्ती अंगिकारली. हा स्वीकार मात्र काहीशा कडवटपणाने व संयमित आशावादाने केलेला होता. प्रा. कुळकर्णी यांची 'स्थायी' वृत्ती या संयमितपणात आहे.

'जग बरे चालले आहे' या कवितेत ही वृत्ती फार स्पष्ट व हृदयस्पर्शी रीतीने प्रकट होते. कवी देवाला म्हणतो :

"देवा! तुवा निर्मिलेले
जग 'बरे' चालले आहे!"

'बरे' म्हणजे कसे? तर आमचे पाय 'अधान्त्री गिरगिरत' आहेत; 'भाऊ भाऊपणाला विसरला' आहे, पाखराच्या पंखफुटल्या पिलाने मातेलाच जखमी केले आहे, थोडक्यात जगात एक 'अजब गहजब' चालू आहे! आणि तरी कवी म्हणत आहे की, "देवा! तुझ्यावाचून, तुझ्या दुनियेत हे सगळे 'बरे' चालले आहे!" एका दुःखी माणसाने दुसऱ्या दुःखजर्जराला विचारावे, 'कसे चालले आहे?' त्याने उत्तर द्यावे 'बरे चालले आहे!' तसे हे आहे. पण, हा कडवटपणाही कवीच्या मनात संयमित आहे. कारण कवीला दिसते की, या अंधाराच्या गहजबातही कुठे कुठे सत्यापुढे वात जळत आहे, कोणी 'चंदनासारखे' झिजत आहे, 'अजून कळीला गंध आहे' आणि हे देवा! 'पाठीवरचे वळ सोसताना तुझ्या कृपेचे बळ आहे!'...

अशा या संयमित, मृदू, आशावादी व सौंदर्यलक्षी वृत्तीने कवी मानवी जीवनातले सुखदुःख एका जिव्हाळ्याने टिपून घेतो; दीन, अपंग, कंगाल व दुर्दैवी जनांबद्दलची करुणा व विषमतेची चीड अनेक कवितांतून कवीने प्रकट केली आहे. 'अनवाणी' व 'फिरतो पट्टा' या कविता या दृष्टीने चांगल्या आहेत. 'वेशीवरील मारुती' ही कविता अशाच कारुण्याने भारावलेली आहे. आणि

तिच्यातील, वेशीवरल्या मारुतीच्या दगडी मूर्तीचा उगारलेला हात मुकुंदाच्या वेड्या पाठीवर वात्सल्याने स्पर्श करण्यासाठी खाली येतो ही कल्पना फार हृद्य आहे.

अशीच उत्कटता काही प्रणयगीतांतून कवीला साधली आहे. "त्या तशा पावसामध्ये" या कवितेत एका अनोख्या पावसाच्या रात्री भेटलेल्या प्रणयिनीची आठवण कवीने पुढील शब्दांत अंकित केली आहे.

आताही पाउस पडतो
बेभान अनोख्या राती,
तेधवा हरपले जे ते
शोधिते आतली ज्योती.

'तशी ती' व 'तुझी भेट' या कवितांतही प्रणयोत्कटता चांगली साधलेली आहे.

नित्याच्या जीवनातले हे सारे हिरवे किंवा काजळलेले सुखदुःखाचे रंग कवीच्या अंतरंगात उमटतात व त्याच्या कवितेला रंगरूप देतात.

यातच एक भगवा रंग मध्येच कोठे तरी दिसतो. रम्य वनराजीमध्ये कोठे तरी देवळाचे शिखर दिसावे व त्यावर भगवा ध्वज फडकताना दृष्टीस पडावा, तसे काही कविता वाचताना वाटते. **बरोबर काय नेणार सांग** या कवितेत कवी सांगतो की,–आज-ना-उद्याची अनंताची अटळ हाक ऐकू येते व मग लक्षात येते की, इथला निरोप घेऊन जाताना देहाची माती, बाळाचे हास्य, स्नेह्यांचा स्पर्श व घराची छाया यातले काहीच बरोबर नेता येणार नाही. मग,—'घेईन म्हणतो एवढे माझ्या बरोबर' असे म्हणून कवी सांगतो की, मी माझ्या कवितेचा एखादा चरण, विठ्ठलाच्या दारची थोडी धूळ, कोणाच्या पापणीत साठलेले पवित्र गंगाजळ एवढे मी बरोबर नेईन.

हीच भगवी आर्तता 'सांभाळा ही वीणा' या कवितेत आहे. एका सज्जन सहृदयाचे अंतकाळी आपल्या लाडक्या पुत्राला सांगणे आहे की—

> 'आमचा पहारा संपत आला', 'चंद्रभागेच्या काठी आमचे
> एक पाऊल उमटले, त्याची फक्त आठवण ठेवा'
> आणि खांद्यावरची ही (जीवनाची) लाडिक वीणा
> आता आम्हाला तुमच्या गळ्यात घालू द्या.
> स्वतःचेच रूप तुमच्या डोळ्यात पोटभर पाहू द्या!

कवीचे मन असे श्रद्धानिर्भर आहे. जगातले अमंगल पाहून मन डबगले व बावरले तरी 'देवावर' भार घालून ते मन परत स्थिरावते, निदान स्थिर होण्याचा प्रयत्न करते. कवीची ही श्रद्धा जुन्या संतकवींच्या विठ्ठलभक्तीचे रूप घेते खरी, पण ती काही झाले तरी त्या भक्तिरसात निमग्न होऊ शकेल का? वि. मं. च्या एकंदर कवितेचे विश्व ऐहिकाच्या रसरंगात न्हालेले आहे. ऐहिकाकडे पाठमोरे होणारे वैराग्य या मनाला लाभू शकेल का? नाही असे वाटते. पण, या 'भगव्या रंगाच्या' कवितांतून कवीच्या या श्रद्धावृत्तीची उत्कटता मात्र प्रत्ययास येते.

—अशी ही कविता अनेकरंगी, ऐहिक पारलौकिकांच्या सीमांना स्पर्शणारी, साध्या, ऋजु शब्दकळेने प्रकट होणारी आहे. रसिकांना ती आवडेल अशी अपेक्षा व्यक्त करून मी प्रस्तावना पुरी करतो. कवितांचा अनुभव हा अशा प्रस्तावनेशिवाय घ्यावयाचा असतो हे खरे. पण माझा काही कवितांपुरता अनुभव येथे मी सांगितला आहे व त्यामुळे रसिकांच्या जिज्ञासेला थोडी उत्कटता येईल एवढी माझी अपेक्षा आहे. कवीच्या 'पाऊलखुणां'च्या वाटेने जाण्याचे सुख रसिकाने, ज्याचे त्यानेच अनुभवावयाचे आहे.

५ मे १९६७ दि. के. बेडेकर

# अनुक्रम


१ फुला, इतका बावरलास का? १
२ शुभदा ४
३ वेशीवरील मारुती ७
४ उरले ते माझे मला ९
५ माझ्या जीवा ११
६ पहाट ती तशीच आहे १३
७ जग बरे चालले आहे! १६
८ बरोबर काय नेणार सांग १८
९ वाहते पाणी २१
१० निळ्या वाटेतून २३
११ कृष्णाकाठी २४
१२ हाती तबक पूजेचे २६
१३ हसतमुखी २७
१४ हे बरे नव्हे २९
१५ तू उरतेस ३०
१६ भोगिली दुःखे ३१
१७ पाहता मागे ३२
१८ त्या तशा पावसामध्ये ३३
१९ एक घर ३४
२० नवल वाटते ३७
२१ घास ४०
२२ गंगाजळ ४२
२३ किती अश्रू वाहू ४४
२४ स्मरण ४५
२५ हे पुरे गा ४७
२६ श्रावण आला ४८
२७ काकडआरती ५०
२८ फिरतो पट्टा ५३
२९ दर्शन ५४
३० कळले अन् कळले नाही ५६
३१ नंदी ५८
३२ हिमालय-गौरव ६०
३३ धन्य त्यांचा जन्मदिन ६२
३४ मित्रा ६४
३५ वधू ६७
३६ पायधूळ ६८
३७ घर, देव आणि गगन ७०
३८ ही ललित लहर ७२
३९ कार्तिकाच्या रात्री ७३
४० पहाटेच्या प्रहरात ७५
४१ सांगता ७६
४२ वेल ७७
४३ नाते ७८
४४ भर दुपारची वेळ ७९
४५ चित्रा ८१
४६ देणे ८३

४७ उखाणा ८५
४८ माझ्या मना रुसू नको ८६
४९ लेखणी ८९
५० नव्हतीस तू ९२
५१ तुला कोठे पाहू ? ९४
५२ अहो असे झाले कसे ! ९६
५३ रिता मंडप ९९
५४ धरित्री १००
५५ कावड १०२
५६ आम्ही संसारी माणसे १०३
५७ कृष्णेचे गाणे १०५
५८ देव कोठे ? १०७
५९ निवान्त नदीचा काठ १०९
६० ऊठ कोकिळे १११
६१ रंग ११२
६२ विसावा ११३
६३ कर्वे रोड ११५
६४ मागे वळून पहा जरा ११६
६५ सूर्य पश्चिमेला गेला ११८
६६ वटवृक्ष १२०
६७ जीवनसाथी १२२
६८ दगडाचा जन्म जरी १२३
६९ सांभाळा ही वीणा १२४
७० वाटचाल १२८
७१ तशी ती— १२९
७२ प्रश्न १३०
७३ मरणालाही दुःख फुटावे १३१



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलांतर
अनुक्रम ४११६२ वि: काव्य
क्रमांक ९८७५ नोंद दि. २८।१।६७

## समई

भडकत्या महागाईत
समईसाठी तेल आणावे कुठून
म्हणून
देवाजवळ समई लावीत नाहीस :
पण
ती समई उचलून
अडगळीत नकोस ठेवू नेऊन
भडकती महागाई शान्त होईतो
'ज्योत' तुझ्या हृदयात ठेव
आणि
रिकामी का होईना
समई देवाजवळच ठेव !

## फुला, इतका बावरलास का ?

फुला, इतका बावरलास का ?
माझ्या अंगुलीचा स्पर्श होताच
थरथरलास का ?
साऱ्या पाकळ्यांनी थरारलास का ?

...   ...

सकाळच्या या शुभंकर वेळी
तुझ्याजवळून जाता जाता
सहज तुला हात लावला,—
थरारलास का ?

—किती अभिनव उल्हासाने
नटला आहेस,
अंतरीचे नाना रंग
तुझे कसे उमलले आहेत...
आपल्याच गंधाच्या धुंदलयीत
तरंगत आहेस
प्रभूच्या या प्रसन्न सृष्टीचे
कौतुकचित्र पहात आहेस
भरल्या डोळ्यांनी !

९८३०६

—किती जन्मांचा प्रवास करून
इथे आलास;
हिरव्या फांदीचा जीवनरस
किती दिवस
वाट पहात होता तुझी.
तुला हातावर खेळवण्यासाठी
झोकेझुके देण्यासाठी
किती दिवस आसुसले होते
या लतेचे लवते हात !
—रंगरूपाचा पूर्णाविष्कार
गगनछायेत डुलत आहे !

...        ...

पण फुला, तू असा
थरारलास का ?

...        ...

तुला वाटले ना—
'हा हात वेलीपासून दूर नेईल मला !'
—मानवाचा हात फूल फूल पाहून
आजवर हेच करीत आला आहे...

पण गड्या—
हा हात एका कवीचा आहे
हे कसे विसरलास ?

—अरे, तुझे माझे नाते आहे
दीनदयाघन देवाच्या बागेमधले
मीही एक फूल आहे—
        उल्हासाने नटलेले,
        गंधलयीत डुलणारे
अंतरीच्या गंधकळा येत्या-जात्या वाऱ्यावर
शब्दनादातून उधळणारे
मीही एक फूल आहे देवाच्या दारचे !

...        ...

राजसा, असा बावरू नकोस
डुलत रहा,
अनंतकाळ मला डुलवीत रहा !

## शुभदा

ही आमची छोटी मुलगी
बघा कशी बसली आहे !
आपल्याच तोऱ्यात गुंगली आहे.
एक करवंद खात आहे--
काळे काळे मिट्ट.
ओठ कसे रंगले आहेत--
लाल लाल चिट्‌ !

ही रसवंती सजली आहे,
सदाचीच सजली असते !

तुम्ही आलात - या, बसा.
तुमच्याकडे फारसे लक्षच नाही.
तसे तुम्हांला पाहिले आहे
किती बोलायचे - काय बोलायचे—
केव्हा बोलायचे--
सारे मनाशी ठरले आहे !
पण वरून आव आहे,--
जसे कोणाला पाहिलेच नाही !

ही आमची छोटी मुलगी :
हिच्या बिलोरी डोळ्यांत पहात
तुम्ही म्हणाल, " नाव सांग ..."

लगेच ओठ खुलणार नाही
लगेच नेत्र खुलणार नाही
जरा आर्जव – जरा आदब --
पाच-दहा झुलुका हव्यात
हिची कळी खुलवायाला !
पाच-सहा प्रश्न हवेत
एक उत्तर मिळवायाला !
मग --
डोळ्यांतील धिटाई संभ्रमात विरघळेल !
भृकुटीला न कळेलसा वळसा मिळेल !
नाव घेण्याचा समारंभ होईल :
दोन पाकळ्या विलग होतील
साखरेत घोळत, जिभेवर लोळत
एक हुंकार बाहेर येईल !

' शुभदा राणी
शुभदा राणी '
किती गोड – मिठ्ठासवाणी

...        ...

कलावंतांचे जसे आहे ––
अभिजातांचे जसे आहे
तसेच या मानिनीचे आहे
मग ती छोटी असो –
        किंवा मोठी असो !

...ही आमची छोटी मुलगी
तुम्ही कधीच विसरणार नाही ;
ही फुलवात देवापुढची
गाभारा काय उजळणार नाही ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक .............................. नों: दि: ..................

## वेशीवरील मारुती

वेशीवर मारुतीचे । देवालय आहे मोठे
सिंदूर-चर्चित भली मूर्ती । उभी कधीची आहे तिथे

एक हात उगारलेला । एका हातात द्रोणागिरी
गळ्यात रुईपर्णांची माळ । दृष्टी जगाकडे सारी

पाहतात सारे मारुतीराय --
– पहाटेपासून रहदारी ... । पहिले विष्णूपंत येतात
ओलेत्याने निथळत निथळत । ... गार तांब्या ओतून जातात !

त्यांचे पुष्ट बाहू मनगट । गळ्यामधला काळा दोरा
आंगामधला ओला सिंदूर । मारुतीला आवडतो सारा.

मग येतात रुक्मिणीबाई । त्यांची बुवा फारच घाई;
अकरा अकरा प्रदक्षिणा । तांदुळाचा एकच दाणा !

उन्हाची तिरीप आणि गुरव । बरोबरच येतात दोघे,
पायापासून वरपर्यंत । मारुतिराय न्हाऊन निघे !

घण-घण आरती चाले । नैवेद्याला शेंगदाणा,
शिवलिंग तेली मात्र आणतो । कधी नारळ, कधी ' आणा '.

दुपारचे ऊन तापू लागते । मंडळी येतात जेऊन-खाऊन,
गार फरशीला देतात ताणून । मारुतीकडे पाय करून !

घुमीजवळच्या बुवापाशी । लाल डोळयांचा चौगुले येतो
लाल-लाल निखाऱ्याजवळ । हिरव्या गोष्टी बोलत बसतो !

उन्हे उतरतात कौलावरून । मग मुलांचा धांगडधिंगा;
पाठशिवणी, आंधळी-कोशिंबीर; । कोपऱ्याशी मुलींचा पिंगा

संध्याकाळीच खरी ‘ मजा ’ । फिरण्यासाठी येतात मास्तर ...
येतात पेन्शनर, ... येतात पोरी । चालते भक्ती, होते चोरी !

... ... ...

रात्र काळोख घेऊन येते । मग येतो वेडा मुकुंदा,
भिक्षा मागण्याचा करतो धंदा । जीवनाचा हुकला सौदा;

मारुतीचे पाय चेपीत बसतो । “ देवा किती थकलास ” म्हणतो,
उगारलेला हात खाली येतो । वेडा मुकुंदा झोपी जातो !

## उरले ते माझे मला

डाळ तांदूळ टिपाया
चिमणी येते दारी,
तिच्या ओठी उठे दुवा
माझ्या संसाराची थोरी

दारी कुंडीत गुलाब—
एक झुकवितो कळी,
त्याने कितीदा मनीची
खूण मला पटविली...

कुडकुडणारा कोणी
गेला धडोते घेऊन,
अंतकाळी सोबतीचा
शब्द माघारी ठेवून !

कपाटीचे ग्रंथराज
दिसा-दुपारी- मध्यान्ही
धीरखचल्या मनाला—
गोष्ट सांगतात जुनी

कसा संसार तरून
संत गेले पैलतीरी

नाव त्यांची सोबतीची
बोले ग्रंथांची वैखरी

ग्रंथांसाठी मूठपसा
घास काढून ठेविला,
माझे जेवण अपुरे
तरी तृप्ती आत्मयाला !

ज्याचे त्याला देऊनिया
उरेल ते माझे मला--
तेवढ्यानेही- लाडका
जीव माझा सुखी झाला !

* *

## माझ्या जिवा !

तुझ्या लहानशा खिडकीमधून
महान आकाश दिसत आहे
तोवर
मरणाच्या गहनगुहेतही
असा अगतिक बावरू नकोस
बावरू नकोस !

ते पहा
मेघांचे शिल्प मनोहारी
सूर्यकिरणांचे साज सोनेरी.
--साधूंची, संतांची, भल्या भल्या ' यात्रिकां 'ची
स्मरणे नित्य जागविणारी
चकाकणारी ती ' विष्णूची नगरी '
जोवर येथून दिसत आहे
तोवर यातनांनी गिळले तरी
असा अश्रू गाळू नकोस !

--जोवर, जोवर,
मेघांचा जथा
साता समुद्रांचे पाणी घेऊन
सारीकडची
तापली माती शिंपण्यासाठी

नीलाकाशातून धावत येताना
पहात आहेस
तोवर तुझ्या मुक्या वेदनांचे
व्याकुळ गीत ऐकू नकोस, ऐकू नकोस !

याच
निळ्या घुमटाखालून
सारी ' यात्रा ' पुढे सरकते,
आपली पताका सावरीत जाते ;
तुलाच तेवढे वगळायला
आकाश असे लहान नाही,
त्याच्या निळाईत लपून राहिलेली
देवाची करुणा कमी नाही;
म्हणून म्हणतो, माझ्या जिवा,
तुझ्या लहान खिडकीतून
आकाश जोवर दिसत आहे
तोवर असा बावरू नकोस !

* *

# पहाट ती तशीच आहे

— या उद्योगनगरीचा
पहाटे चारचा
गिरणीचा भोंगा वाजून जातो,
झोपेचे पांघरूण माझे
चाळवले जाते
क्षणभर!......

या यंत्रनगरीतही
कोणी प्रेमाने पाळलेला
कोंबडा दुरून आरवतो, 'कुकूच कू'
शिणल्या पापण्यांची
उघडमीट होते
क्षणभर.........

▣ ▣ ▣

"कोंबडा आरवला, बापू आता उठतोस ना"
जुन्या वाड्याच्या सोप्यावरून
जीर्णस्वर कानी येतात- नाहीसे होतात.
'अभ्यास तुझा राहिला आहे' पुन्हा स्निग्ध
हाक येते
पांघरूण चाळवले जाते......

' घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला '—
गाईच्या गोठ्यातून वडिलांचे स्वर
उजळीत असतात देवाचे घर !
' उद्या त्रिपुरी पौर्णिमा आहे,
बेल तोडायला बागेत जायचे ना '
कोणी कानात म्हणत असते;

—आईची शाल अंगावरून दूर सरकत नाही
मला कशी धरून राही !
' झोपू द्या त्याला, काल खेळून दमला आहे '
एवढाच आवाज येत राहातो
क्षणभर......

मंद ' कंदील ' लागला आहे
पाण्याच्या हंड्याखाली
काटक्यांचा जाळ येथून येथून दिसतो आहे !

—आता रवी डेऱ्यात आहे
दधिमंथन चालू आहे.
आईच्या बांगड्यांचा आवाज
मैलांवरून मी ओळखू शकतो !
बांगड्यांचा, पावलांचा, स्वरांचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ ग्रं. दि: ............

सारे आवाज कानी येतात,
...पांघरूण उगाच चाळा करते
धरून ठेवते !
करकरणारे परसदार सयेच वाजते,
बापू अजून झोपला आहे म्हणून लाजते :

—' डोळे तुम्ही घ्या रे सुख । पाहा विठोबाचे मुख '
पुन्हा वडिलांचा येतो स्वर
गोंजारीत सारे घर
क्षणभर.........

—' खरेच, बेल आणायला हवा '
पापण्यांची उघडमीट होते.
कोंबडा आरवत असतो ' कुकूच कू '
पांघरूण दूर फेकून मी उठतो
—पहाट ती तशीच आहे,
' झोपू द्या त्याला, खूप खूप दमला आहे '
म्हणणारे मात्र कोणी नाही
कोणी नाही !

## जग बरे चालले आहे !

देवा ! तुवा निर्मिलेले जग ' बरे ' चालले आहे !...

सूर्यरथाच्या चक्रासंगे— आमची चाके फिरू लागतात;
देहामागे धावणाऱ्यांचे पाय अर्धान्त्री गिरगिरतात !
चरण्यासाठी चोचीतून गवतकाडी पण चालली आहे
देवा ! तुवा निर्मिलेले जग बरे चालले आहे !

अजाण म्हणा सुजाण म्हणा, भाऊ विसरे भाऊपणा,
पोटीचे ते पोटी धरून पाठीच्याला घास उणा !
बहिणीची तर ओवाळणी मूग गिळून उभी आहे
देवा ! तुवा निर्मिलेले जग बरे चालले आहे !

माते ! तू का रडत आहेस ? तुझ्या गालांवर कसले पाणी !
पंख फुटलेल्या पाखरानेच काय जखम केली उडताक्षणी !
पूस अश्रू...पूस अश्रू, अजून प्रलय दूर आहे
देवा ! तुवा निर्मिलेले जग बरे चालले आहे !

अंधाराच्या वळचणीखाली तेलावाचून उजळे रात,
प्रकाशाला झापड लावून–– फिरणारांची न्यारी बात !
तुझ्यावाचून, तुझ्या दुनियेत, अजब गहजब चालू आहे
देवा ! तुवा निर्मिलेले जग बरे चालले आहे !

मात्र अजून सत्यापुढे कुठे कुठे जळते वात;
मायपित्यांच्या प्रतिमेपुढती अजून कोठे जुळतात हात!
गंध होऊन फिरणाऱ्यांचे चंदन कोठे झिजत आहे
देवा! तुवा निर्मिलेले जग बरे चालले आहे!

अजून कळीला गंध आहे, अजून तारका चमचमतात;
अजून चंद्राच्या किरणांसाठी-- सागरलाटा हेलावतात,
पाठीवरचे वळ सोसताना तुझ्या कृपेचे बळ आहे!
देवा! तुवा निर्मिलेले जग बरे चालले आहे!

## बरोबर काय नेणार सांग

हवा पावसाळी असते :
आकाशात गजबजलेले ढग
दाटी करून उभे असतात !
' दिवसाचा राजा ' दिसत नसतो
मन कुंद कुंद असते :
—नकळे काय कुठून त्याला
दूरदूरच्या अनंताची
आज–ना–उद्याची
' अटळ हाक ' ऐकू येते

माझे मन अचानक
मला एक प्रश्न विचारते—
" इथला निरोप घेऊन जाताना
बरोबर काय नेणार सांग ! "

काय सांगावे त्या वेड्याला !
( ढग तर वर कुजबुजत असतात... )

मनात येते—
नेईन म्हणतो काही काही :
—देह नेता येणार नाही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ४१९६२ वि: काव्य
क्रमांक १७०४५ नों. दि. १६।१।६८

नाही तर
याच देहाची मूठभर माती
आवडीने बरोबर घेतली असती !

--बाळाच्या नेत्रातले तरंगते हास्य,
प्रेमळांचे श्वास, निःश्वास,
स्नेह्यांच्या हातांचा ऊबदार स्पर्श,
आवडीने बांधलेल्या घराची छाया,
--काहीच नेता येणार नाही
नाही तर
हेही काही घेतले असते !

पण म्हणतो
नेता आलेच काही बरोबर
तर घेईन--
माझ्या कवितेचा एखादा लाडका
घुंगुरवाळा चरण !

घेईन
विठ्ठलाच्या दारची धूळ
अन् त्याच्या कंठातील तुळशीची मंजिरी !

घेईन
कोणाच्या नेत्रातले मी पुसले अश्रू,
कोणी माझ्यासाठी पापणीच्या काठी
साठवून ठेवलेले पवित्र गंगाजळ !
घेईन म्हणतो, हे एवढे माझ्याबरोबर

## वाहते पाणी

वाहते पाणी, हिरवे गवत
यांची मला हवी संगत,
संध्याशीतल हसरा वारा
तोही मनाला वाटतो बरा !

ऊन मावळून टळून गेलेले
सरता थोडा प्रकाश असावा,
घरओढीने झेपावणारा
पक्षिकुळांचा थवा दिसावा.

'परीटघडी' गजबज नको,
ताठ, तप्त रस्ता नको;
घट्ट लठ्ठ पुस्तके नकोत !

आपलाच एक स्मृतिग्रंथ
मनच्या मनी चाळीत असावे,
वहात्या पाण्यात पाय सोडून
स्वतःशी बोलत स्वस्थ बसावे !

सुखदु:खाची मासोळी
केव्हा नाजूक चिमटा घेईल
त्यानेच फक्त चमकून जावे !

रंगरेषा पुसेपर्यंत
वहाते पाणी वहात असावे ! ...

## निळ्या वाटेतून

चंद्र पहाटचा--त्याचे इवले चांदणे
निळ्या वाटेतून त्याचे हळूहळू जाणे !

कुंपणाच्या कळ्यावेली पाहतो दुरून
मायाभरल्या हाताने घाली पांघरूण

झोप-चाळवल्या बाळा माता घे कुशीत
तिथे एक दृष्टिक्षेप आनंदभरित.

कुठे कुणी कवी जागा लेखणीशी बोले
पहाटचा चंद्र तिथे क्षणैक रेंगाळे,

चंद्र पहाटचा माझा जुना सवंगडी,
त्याच्यासाठी सोशितो मी रात्र दुःखवेडी !

## कृष्णाकाठी

कृष्णाकाठी
उंच तटावर
मंजुळ पाने इवली हलवित
होते जागत,
---शिवालयाच्या अवतीभवती--
लाजलाजरे चिंचेचे बन ! ...

शिवरात्रीच्या यात्रेवेळी
हात गुंफवुन हातामध्ये
किती खेळलो खेळ सुखाचे
अल्लडवाणे;
--लपंडाव तू खेळलीस ना
याच बनामधि माझ्यासंगे
गाभुळलेली चिंच बनून !
थट्टा करता--
पळालीस ना
होउन उन्मन, याच बनातुन !

दिसादिसांची वठली झाडे...
अमित वाहिले कृष्णेचे जळ...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नोंद दि ........................

—आज पुन्हा मी
किती दिसांनी
फिरून आलो, सूर्यास्ताला
याच बनाला
तुझियावाचुन :

—कृष्णाकाठी अजुन जागते कसे कळेना
एक लाजरे चिंचेचे बन
वाऱ्याची बट गालावरती इवली घेउन;
अजुन डोलती कशी कळेना
इवली पाने गिरकी लेउन !

* *

# हाती तबक पूजेचे

हाती तबक पूजेचे
फुले त्यात जास्वंदीची;
तेवणारे नीरांजन
वडी एक कापुराची !

पूजेआधीच पूजेचे
मुखावरी समाधान
आज पौर्णिमा वडाची
आज द्यायचे वायन

निळ्या-पारव्या वाणाची
रुळे साडी अंगावरी
लाल कुसुंबी चोळीचा
काठ गोऱ्या दंडावरी

—अनवाणीच निघे ही
नार दुपारी वडाला,
कोणा रसिक डोळ्यांनी
मार्गी गालीचा घातला !

## हसतमुखी

कुंद्कळ्यांची वेणी, कानी
लांब बोलके डूल
हसतमुखी दाविते नवोनव
यौवनचाहूल !

बावरली तर्जनी ठेविली
अधीर ओठांशी
हसू अनावर तरी उमलते
नयनांच्या देशी

दूर उद्याच्या संसाराचा
कठिण वनप्रान्त
प्राजक्ताच्या जगात फिरते
दवामधे न्हात !

—पाहिन ज्याला, जिंकिन त्याला
असा मनामधि भाव
तरी मुखावरि शालिनतेचा
स्वाभाविक भाव

या डोळ्यांमधि एळाळणारी
ओढ्याची गाणी
या डोळ्यांमधि नील नभातिल
ताऱ्यांचे पाणी !

सूर्यांमधले घेउन काही,
चंद्रामधले काही--
मूर्त घडविली,-ध्वजा सृष्टिची
लहरत की राही !

* *

## हे बरे नव्हे .... !

उमलल्या गुलाबापरी
तुझ्या या टाचा
करितात चुराडा
पथी किती हृदयांचा !

हे बरे नव्हे गे,
काय अशी भरदिवसा
तू येता-जाता--
उगा करावी हिंसा !

* *

## तू उरतेस

तापलेला दिवस मावळतो
रात्र अवतरते;
जडावर अंधाराची माया पसरते

तुझे-माझे
दिसाभराचे, ताणलेले
रागद्वेष
हलके मावळतात...
आणि
निखळ तू उरतेस
तारकामयी !

कोऱ्या चंद्रकळेची
सळसळ लेवून
मनाच्या दारवंठ्याशी
उभी रहातेस !

## भोगिली दुःखे

भोगिली दुःखे तयाची
ना निशाणी ठेविली,
भोग संपे भोगुनीया
हीच भाषा राहिली ...
मानवी दुनियेत येथे
देव माते भेटला,
रंगुनी नाना परींनी
पोटी-उरी जो राहिला !
गाइले नादीपणाने
हासला कोणी तयाला,
आणि वेडा कोणि केव्हा--
वाहवाही बोलला !
या स्तुतीची--अस्तुतीची--
जाण आहे अंतरी;
पेरिले मी शेत आता
मूक माझी वैखरी.
—वल्हवीतो नाव माझी
मात्र होई ' तू ' सुकाणू;
सांज होण्याआधि आता
पार जाऊ या- म्हणू :

## पाहता मागे वळोनी

--पाहता मागे वळोनी पापणी जाई भिजूनी,
वाटते रुसल्या मनाला विश्व ते गेले कुठे?

पाखरे जमली सुखाने एक कणसाभोवती--
ती सुगी, त्या रम्य रात्री, शेत ते गेले कुठे?

मारिता वेगे भरारी आकाशही झाले थिटे,
मेघवेडे शक्तिशाली पंख ते गेले कुठे?

स्निग्ध मायेचे, फुलांचे घाव पुसती पाठिचे
अंतरी जे ओळखीचे हात ते गेले कुठे?

जीविताच्या रुक्ष रानी हात धरुनी ओढिते
लाल, वेड्या पालवीचे स्वप्नही गेले कुठे?

-- शोधितो माझ्या ' मी 'ला, वाट राहे एकटी;
ज्योतिचे एका परंतु तेज आहे सोबती!

## त्या तशा पावसामध्ये

त्या तशा पावसामध्ये
भेटलो,-- भेटलो नाही;
द्यायचे ते दिले नाही
घ्यायचे विसरलो काही !...
बेभान अनोखी वीज
अवकाशा उजळित होती,
मेघांच्या पडद्यामागे
जरि विझली गगनज्योति
त्या तशा पावसामध्ये
अंगांग चिंब भिजलेले
ओलेत्या डोंगरमाळा
मातीचे मन हललेले !
तू वसन नवे ल्यालेली
त्या रोमांचाची गाठ,
त्या अथांग नयनांमध्ये
क्षण दिसला यमुनाघाट ...
--आताही पाउस पडतो
बेभान अनोख्या राती,
तेधवा हरपले जे ते
शोधिते आतली ज्योती !

## एक घर

एक घर—गोजिरवाणे
ज्याला त्याला घाली उखाणे !
केळीबाईशी बोलत बसते,
हाक नारळीला घालीत असते.
रांगोळीची टिकली लेवून
आपल्याशीच उगा हसते
उन्हाची साडी तीन्दा नेसते,
रात्री सुखात झोपत असते !...

एक घर—जांभई देते
चष्म्यांतून बघत असते.
घट्ट घट्ट दगडी भिंती
आडवीतिडवी उंच जोती
याच्या पोटात विहीर आहे
'ओल्या देहाने' बुजवलेली !
याची एकेक पायरी आहे
नाल-खिळ्यांनी घडवलेली !
हे हसते खदाखदा
शतकातून फक्त एकदा...

एक घर भिंगुळवाणे —
बघते गजांच्या डोळ्यांतून

काळ्या भिंतीची कोळिष्टके
उराउराशी धरते जपून !
—कुठे कुणाची ‘सनई’ वाजे
कम्प उठती त्या आवाजे.
कोनाड्यात कोनाडा खोदावा
त्याच्यावर देव लादावा,
पूजा चाले रात्रंदिवस
पोटात कुजले सारे नवस...

एक घर–चौकोनी —
कोन सांभाळीत असते
नाक याचे नकटे
पण नाकासमोरच हे जाते !
दरवर्षी पावसाळ्यात
कौले शाकारून घेते
लाल माती, पिवळी माती —
या दोहोंत सारे सजते
कधी दाराला ‘ लिंब-पाला ’
लागला म्हणजे आनंद झाला ! ...

— एक घर — देव-घर
चंद्रभागेच्या काठावर !
गोपीचंदन, बुक्का लेते
तुळशीदळाची माळ घेते !
न कळे याचे काय बिनसले ?
बाइलेपासून वायले झाले
सगळीकडून उघड्या पेठा
आनंदाचे वाण लुटा—
तिथे एक ' बाळ ' आहे उभे
संतसज्जनांच्या सभे
– त्याची दिव्य पाउलशोभा
वंदीत मी आहे उभा !

## नवल वाटते....

नवल वाटते, नवल वाटते
काटे डोळ्यांत खुपत असतात
तरी माणसे जगत असतात !

दोन चटयांचे खोपटे केले
ते संसारानेच भरले
'संसारा'च्या मायेपुढती
उन्हा-पावसांनी हात टेकले
--उघड्यावर, उघडी बाळे
उघडा वारा झेलीत असतात
तरी माणसे जगत असतात !

अपमानाचा गिळता घुटका
बड्याबड्यांना लागे ठसका
उगाच रडतो डोळा लटका !
अशी बहाद्दर आमची आतडी
घुटका, ठसका पचवीत बसतात
आणि माणसे जगत असतात !

दीड वितीच्या पोटासाठी
किती वणवण, किती वणवण
चोचीत कुठे गवसेना कण !
उद्या उगवणारी कणसे स्मरून
कोणी वेडे हसत असतात
आणि माणसे जगत असतात !

पाण्यात पीठ मिसळून त्याला
दूध म्हणून पुढे केले
माउलीच्या अश्रूंसकट
बाळ तेही दूध प्याले :
जुनी कथा – जुनी व्यथा —
'दोन्ही ओघळ' वहात असतात
आणि माणसे जगत असतात !

वादळवारा झिंगलेला
होडीचे मन थरथरलेले,
नाही हातात वल्हे कसले,
तरी पैलतीरावर —
अंतरज्योतीच्या साक्षित्वाने

मराठी ग्रंथ संग्रहालय, सार्व. स्थळप्रत

धुगधुग डोळे खिळून बसतात
आणि माणसे जगत असतात !

नवल वाटते, नवल वाटते
प्राण डोळ्यांत खुपत असतात
तरी माणसे जगत असतात !

* *

# घास

अन्नब्रह्माची साधना करून
" अन्नपूर्णा " माझी
भरले ताट ठेवी मजपुढे :
षड्रसांचा गंध
देई आनंद
सूर्यासंगतीच उठून झटून
केले होते काम
गाळीत घाम
सूर्य डोईवर येईपावेतो :

— पहिला तो घास घेतला हाती...
तोच रस्त्यावरी
उठे ललकारी :
' उपोषण कोणी मांडिले आहे
याच नगरीच्या त्यागी सज्जनाने
भुक्या मजुरांच्या
चुलीतील अग्नी पेटावा यासाठी ! '

अडला घास अध्यावरी माझा;
" एक तरी जन जोवरी दुःखात
तोवरी श्रीराम नाहीत सुखात "

ऐसे काही ग्रंथवचन स्मरले,
मन हे रुसले
घास उचलीना !

--शहाणी बुद्धी सन्मार्ग सुचवी
' अरे जीवा, तुला काय उठाठेवी
तुझे तू जीवन कष्टाने चालवी !
किती-तरी जन उपाशीतापाशी
त्यांचा फास कसा तू रे सोडविशी ?
चाकाने आपली चाकोरी चालावी
घरात चुलीशी भाकरी खावी...'
-मनाला भाबड्या काही ते पटेना
अडला हात ओठांना भेटेना
" मिळो माझ्या सर्व बांधवांना खाया
सुखात राहोत लेकरे नि आया
असो सर्वांवर प्रभो, तुझी छाया "
एवढी प्रार्थना मनाने म्हटली !
--पहिला तो घास काढून ठेविला,
देहाचे जेवण पुढती चालले...

## गंगाजळ

बालपणी मी आईला
सहजच विचारले—
" आम्ही चौघे पुत्र तुला
एक बहीण आम्हांला,
माया कोणावरी खरी
सांग आई, सांग तरी—"

" पाची बोटे या हाताला
सारखीच प्रिय मला ! "
सांगताना सर्वांविशी
मला धरिले पोटाशी !

आज आता– मोठेपणी
माझ्या फुलत्या संसारी
माझ्या गोपाळांचा लळा
मला लागलासे भारी

—माया कोणावरी खरी
असे वेड मनी येते,
तेव्हा मला माउलीचे
प्रेमवचन स्मरते...

——कोणी बोट सोडूनीया
गेले तेही आठवते,
त्याच्यासाठी या नय
गंगाजळ उभे होते !

* *

## किती अश्रू वाहू

माझ्या वडिलांनी  लावियेले झाड
जांभुळे ती गोड  सेविताहे
इवले ते रोप  लावियले द्वारी
त्याचे पान गेले  गगनावरी !
फळे गगनात  पक्ष्यांना, पिलांना
फळे लेकरांना  भूमीवरी
देह कष्टविला  माझ्या मायबापा
आम्हासाठी खोपा  उभाराया...
हिरव्या तांबूस  कोमल पानांनी
मायेच्या छत्रांनी  वेढियेले :
डोंगरकुशीत  पिकविल्या केळी,
वेड्या सीताफळी  बहरल्या...
उदार हातांनी  मिळेल ते वाटा
ह्याच भोगवटा  दिला आम्हा
किती अश्रू वाहू  चरणांवरती
माथ्यावरी पोथी  वाहतसे.

* *

## स्मरण

आज स्वातंत्र्याचा सण
दारादारात रांगोळी,
ध्वज तिरंगी फडके
गात ' बेचाळीस ' ओळी

आज स्वातंत्र्याचा सण
सारी शृंगारली आळी,
परी टोकाच्या त्या घरी
ज्योत अधिक फुलली

—होते हुतात्म्याचे घर
उजळीत दिशाकोन;
होती आत माता उभी
अश्रू अंतरी गिळून !

आज स्वातंत्र्याचा सण
घरी गोडधोड केले,
एक पान वाढूनिया
तिने राखून ठेविले...

आज स्वातंत्र्याचा सण
दारी केली दीपावली,
एक पणती अधिक
तिने आणून ठेविली !...

—वृक्ष लाविती महात्मे
जना साउलीचे घर !
हुतात्म्यांच्या पणतीचा
युगायुगांना आधार ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७१२६२ वि: काव्य
क्रमांक १७४५ नोंद दि: १६।१।६८

हें पुरे गा

कळलेच नाही या जिवाला
बंद दारे जाहली;
धावलो वेड्यापरी अन्
सोशिली मी काहिली !
लेकरू मानूनि ज्यांना
घेतले खांदी-कटी,
तेच वेडावीत माते
थांबले तेथे, तटी....
भाळलो खोट्या हसूला,
जाणुनी खोटेच होते;
खोटे हसूही लाभण्या
पुण्य गाठी लागते !
कावडी वाहून स्कंधी
घाव आता वाहतो,
रक्त वेडावी मला मम
त्यात आता नाहतो !
--हे पुरे गा, सर्व आता,
दे मना एकान्त-शान्ती :
धैर्य दे भोगावयाला
ज्ञानदेवांची विरक्ती !

## श्रावण आला

श्रावण आला, हा श्रावण आला !

प्राजक्त नाजूक सुगंध साजूक
उधळी उषेच्या वेळा–
श्रावण आला !

हिरव्या रानात, पाण्याच्या मनात
सुगंध भरून गेला–
श्रावण आला !

झाडाच्या फांदीला, हिंदोळा बांधिला
सुखात फिरतो झुला !–
श्रावण आला !

कोमल हळवा तांबूस तळवा
मेंदीने लालट झाला––
श्रावण आला !

साजऱ्या वसनी, नटुनीथटुनी
निघाला रमणीमेळा––
श्रावण आला !

लेक ये माहेरी, हासली ओसरी
आईचा पदर ओला !--
श्रावण आला !

हसरी प्रसन्न, धरणी देखून
देवही गोकुळी आला--
श्रावण आला !

## काकडआरती

वेळ सकाळची, गोरीमोरी
मीही थोडा गोरामोरा
चाललो होतो नगरातील डांबरी रस्त्याने
विठ्ठलाच्या देवळाकडे माझ्या
थोडा काकडत
हात आखडत !

—'नमस्कार, दादा '
कोठून कंपित आवाज आला
ओळखीचा वाटला :
रस्त्याकडच्या दुकानच्या फळीवर
एक जीव कुडकुडत बसलेला :
[ फळीवरच झोपला असेल
कारण त्याला घर नाही ! ]
डोईवरची गांधी टोपी सावरीत सावरीत
म्हणत होता, ' नमस्कार, दादा '
—याला केव्हा जादा हमाली दिली आहे
—दिले आहे एक फाटके कुडते;
आदबीने स्वतःला सावरीत म्हणत होता
नमस्कार, दादा......

--थोडे पुढे
कोपऱ्याशी वळलो :
उकिडवा बसलेला एक दाढीवाला
अंगावर काळा डगला; डोईला पांढरे
फडके गुंडाळलेले, वेटाळलेले.
" आलेकुम् सलाम " म्हणाला
नेत्रांत प्रेमळपणा साठवून
सकाळच्या प्रेमळ उल्हासाने
केवळ ' आलेकुम् सलाम ' म्हणाला...
त्याच्या कटोऱ्यात केव्हा पैसा टाकला होता
पण, त्याला आता ' दान ' नको होते
केवळ प्रेमाची ' दाद ' हवी होती !

--लगबगीने येत होते गुरुजी
समोरून समोरून......
काळा साधा कोट, पांढरी टोपी नेहमीची
पांढरे स्वच्छ साधे धोतर
कपाळी पांढरे गंध, शुचिर्भूत, शुचिष्मंत.
--नेहमीसारखेच लगबगीने
शिकवणीला निघाले असावेत,
नेहमीसारखीच मान लववून

दा. क्र. ९६३०७

मुखावर भेटीचा आनंद ओसंडून
‘ दोन्ही कर जोडोन ’ म्हणाले मला
“ नमस्कार--सर ”
त्यांना कधी मी काहीच दिलेले नाही;
त्यांनीच मला दिले आहे
माझ्या मोठेपणाचे दान !
‘ नमस्ते गुरुजी ’
मी हसून म्हणालो
आणि, परतलो--

काकडआरती होण्याआधीच
देवदर्शने झाली होती !

## फिरतो पट्टा

उंच फाटकाच्या पल्याड, आत
फिरतो पट्टा फिरते चाक! ...
मागाची छाती धडाडे किती!
मऊसा कापूस पिळून पिळून
जातो रे ओढिला धागा लांब लांब,
शिंपडीत वर घामाचे अत्तर!
– गुंतल्या सुताचे अनंत चौकोन
नटून थटून राहती खडे,
पाहती हसत 'निर्मात्या'कडे
फिरतो पट्टा फिरते चाक! ...
– दिनान्ती शेवटी वाजते सुट्टी
चौकोनी लोखंडी फाटकामधून
स्वये सर्वांगाची 'झडती' देऊन
निर्मात्याची स्वारी निघाली घरी
घेऊन हातात मिळाला सस्तात
गिरणभिंतीशी विकाया आलेला
भाजीचा पाला, हिरवा पाला ...
– कपाळी लागला घामाचा थेंब
गगनामधल्या दीनदयाघन
वाऱ्याने टिपला, वाऱ्याने टिपला!

## दर्शन

कितीक वर्षांनी
परवा असा जन्मग्रामी गेलो
दर्शनासाठी कुलदैवताच्या.
घडले दर्शन देवाचे
घडले दर्शन गावाचेही;
जुने चेहरे पुन्हा दिसले
खंगलेले, भंगलेले;
चेहरेच—की, ती बाळपणी पाहिलेल्या
चेहऱ्यांची भुते !

जुनी घरे जमीनदोस्त
जिथे रांगोळ्या उमटल्या होत्या
तिथे नुसते मातीचे ढीग.
विहिरींची माचाडे उदासीन
देवळाचे वासेही उरले नाहीत
देव कुठे आडोशाला गेला ?
दोन्ही हात देवापुढे जोडले
आणि एक साक्षात्कार झाला.
" पिढीमागून पिढी पिकते,
गळून पडते,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ नों. दि: ............

माझे यौवन अबाधित आहे
मनाचे पान पिकले नाही ! ”

एवढे चैतन्य कुणी दिले ? कुणी दिले ?
पुन्हा पुन्हा पूर आले
हे ‘ झाड ’ नाही नमले !
याच्या शाखा पल्लवित,
याची फुले टवटवीत,
फळाचा बहर रसभरित
—याला कोण पाणी पुरवितो ?

वारंवार शिणल्या हातांना
मातीच्या उदरी, हाताहातांवर
एवढा कसला खळखळणारा
झरा मिळाला ?
त्या पाण्याने माया केली— करून घेतली—;
काळ— आभाळ किती तापू द्या
जिता झरा आटत नाही !

——कुलदेवाचे दर्शन घेता
एवढी एक खूण पटली
दोन्ही हातांनी टाळी पिटली !

* *

## कळले अन् कळले नाही !—

मित्राचे मुख जहर ओकिते !
अंधारातुन—चावे घेते
ही ' किमया ' का, कैशी घडते ?
नवलच हेही...
कळले, अन् कळले नाही !

' तुझा सखी मी '--म्हणतो तुजला,
अद्वैताचा रंग निराळा;
तरीहि केव्हा दुजाभाव का--
दंशत राही...
कळले अन् कळले नाही !

बुडता डोही, प्रभु आठवतो,...
हात तयाचा कुठे न दिसतो,
' करांगुली 'वर परंतु तरतो
अनुभव नित येई,
हे कळले—कळले नाही !

' का जगतो हे जीवन असले '...
अंधारी मन कितिदा रुसले

तरी तयाला नवकिरणांचे—
स्नान कसे होई,
कळले अन् कळले नाही !

* *

## नंदी

माळावर डरकाळी फोडित
वृषभ उभा हा !

नदीतटाशी टक्कर देता
रक्त उतरले विशाल नेत्री
शिंगावरती ओली माती
पायांनी उखणितो धरित्री !
सर्वांगावर धूळ उधळिता
पुन्हा पुन्हा डरकाळी फोडित
आव्हानित
साऱ्यासाऱ्यांना
स्वयंमन्य, धुंदीत उभा हा...

खळाळणारी प्रमत्त गंगा
जटेत झेलित उभा सहज जो
त्या ' शंभू 'चे वाहन हाच !
—कुणा मुनीने असाच याला
केव्हा देखुन
' नंदी ' म्हणुनी नाम ठेविले
या शक्तीला वंदन केले...

—या शक्तीने नेसुन वेसण
शत शतकातुन
मित्र–बंधु–सोयरा होउनी
फाळ ओढिला,
हा भूमीचा पुत्र चालला
तुडवित माती, तुडवित माती
किती अनामिक जोडित नाती !

––' आता ' राहिल यंत्र धडाडत
पाटाभवती,
घाटावरती,
नांगरटीच्या भूमीवरती;
फुटतिल नारळ यंत्रापुढती
गळयात त्याच्या पडतिल माळा !

अन् हा नंदी
विटकी तुटकी झूल नेसुनी फिरेल दारी !
–कधी नदीच्या बांधावरुनी
विशाळ काळ्या नयनी पाहिल
धडपडणारे पुत्र मनूचे !

## महाकवी कालिदासकृत
## हिमालय—गौरव

हा उत्तरेला हिमवन्त आहे । हा देवतारूप नगाधिराज
स्पर्शीतसे पश्चिम–पूर्व सिंधु । वसुन्धरेचा जणु मानदण्ड ! १

अनंत-रत्नाकर हा असून । हे बर्फ या लांछन मात्र नाही,
गुणराशिमाजी जरि एक दोष ।–लोपेच तो, चंद्रकलंक जैसा २

शिखरी तयाच्या नवरंग धातु । ते अप्सरामंडनकार्य-हेतु !
तयांमुळे मेघहि लाल होता । अकालि ‘ संध्या ’ जगतास भासे ! ३

गजेन्द्रमाथा जणु लाल बिंदु । ऐशी लिपी धातुरसे लिहून
त्या भूर्जपत्रांवरती लिहीती । दिव्याक्षरी किन्नरी प्रेमपत्रे ४

दरीमुखातून वरी वहाता । वेळूवना बासरि जो करीतो
गानोत्सुका किन्नरमंडळीते । वारा तिथे साथ करू पहातो ५

कंडूविनाशार्थ मतंगजांनी । जे घर्षिले उन्नत देवदारू,
त्यांच्या रसे आर्द्र असा समीर । करी हिमाद्रीस सुवासमत्त ! ६

ते गोठले निष्ठुर बर्फ मार्गी । हो किन्नरींच्या चरणां असह्य
पुष्ट स्तन-श्रोणि-भारामुळे त्या । वेगे तथापि मुलि चालवेना ! ७

भिऊन सूर्या, अभयार्थ आल्या-। ‘ तमास ’ हा देइ गुहेत थारा
शरणार्थिया सानथोरा समत्वे । सांभाळिते सज्जनस्नेहधारा ! ८

सप्तर्षिनी वेचुनि, राहिलेली । पद्मे तळ्यातील गिरीशिरीची
फुलवीत हा ऊर्ध्वमुखी करांनी । खालून त्यांच्या फिरता, मरीची ! ९

हा यज्ञसाहित्यखनी हिमाद्री । धरित्रिचा धारकही म्हणून
अर्पूनि याला निजयज्ञ-भाग । ब्रह्मा करी गौरव-“ हा नगेन्द्र ” ! १०

* *

## धन्य त्यांचा जन्मदिन :

( पंडितजींच्या स्मरणभावाने सुचलेली कविता )

सूर्य माध्यान्हकाळचा
मध्याकाशीच थांबला
पुत्रा पंडिताच्यासाठी
दुःख धरित्रीमातेला !

--वारा वाहतो नित्याचा
भान नाही त्या वेड्याला,
परी कळस देवाचा
मनोमनी झुकलेला !

आता एका लाडक्याची
पूर्ण झाली महायात्रा
कोटि अश्रूंचे उदक
तया न्हाणिते पवित्रा

झाली यज्ञाची सांगता
आता जावे वनान्तरा;
त्यांच्या पावलांपुढती
लाल गुलाब अंथरा...

जगन्नाथाच्या रथाचे
क्षण स्थिरावले चाक,
माझ्या मना, पहा पहा
गगनात अभिषेक :

अशा महात्म्यांच्यासाठी
रथ सूर्याचा थांबतो,
चांदण्याचे शुद्धोदक
चंद्र पायांशी वाहतो

--धन्य त्यांचा जन्मदिन,
धन्य निर्वाणाचा दिन;
आम्ही जगावे—जागावे
अशा दिवसालागून...

* *

## मित्रा !

तू भेटला होतास
हे खरेच वाटत नाही.
त्या वळणावर
यात्रेच्या गर्दीतच
तू माझा हात पकडलास,
आणि
शोधीत राहिलो मी
जन्मान्तरीचे देणे-घेणे
तुझ्या स्निग्ध शान्त नेत्रांत...

त्या डोळ्यांत एकदा जे वाचले
ते नित्य वाचीतच होतो :

--त्या डोळ्यांत
संसारहाटी सहजी न भेटे
अशी निरागस माया होती :
भुकेल्या जीवाला घास भरवावा
ही एक आस होती :
एक पेटलेली जिद्द होती
मातेचा ध्वज उंचावण्याची :

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४१९६२ वि: का०८१
क्रमांक १७०४५ नों. दि. १६।१।८५

हौस होती !
होती !

.........

यात्रेतील मौज
थोडी पाहिली न पाहिली,
थोडी मौज पाहून
हसलास न हसलास,
मुलासाठी साखरचित्रे
घेतली न घेतली
तेवढ्यात, हात सोडून
चिरंतनाच्या यात्रेत कुठे मिसळलास ?

नारळ हाती होता,
पण देवदर्शन राहिले होते
हे कसे विसरलास ?—

यात्रेत होतो हे खरेच वाटत नाही !

किती हितगुजे केली,

ती हिंपुटी होऊन
मला विचारतात
" तो कुठे आहे ? "
संगतीने जे साहिले
ते असह्य झाल्यावर
प्रश्न उठतो काळजापाशी
" तो कुठे आहे ? "
—खरेच, तू कुठे आहेस !

—केव्हा तरी खळखळून हसणाऱ्या तुला
आता हसवीत असेल काय कुणी ?
रथ ओढण्यासाठी हे हात आहेत
असे मानणाऱ्या तुला
' रथयात्रा निघाली आहे ' हे सांगेल काय कुणी ?

* *

## वधू

मंत्रवाद्यांचा गजर
घुमे कानांत अजून,
वास कोऱ्या वसनांचा
माथी राहिला भिनून;

आठवतो ' त्या ' हाराचा
सुकुमार जडपणा,
गोऱ्या पाउलांवरती
हळदीच्या ओल्या खुणा !

कंच हिरवी बांगडी
मनगटावरी खेळे!
नवी नवी काळी पोत
कंठी दिमाखात रुळे

—हे तो सारे अ नो ळ खी,
नवे जन, नवी रीती;
त्यात त्याचे मोठे डोळे
भिणारीला भिववीती !

## पायधूळ

बाळा, घेतो कडेवरी
उधळीसी पायधूळ
सारी मलीन धडोती
स्वैर मांडलासे खेळ !

विषयात गुंतलेले
माझे ओढाळ हे मन
तुझ्या निर्मळ लीलांनी
होते पावन पावन

–माझ्या इवल्या अंगणी
पुन्हा वाजली पैंजणे,
बाळरूपा, परब्रह्मा !
कशासाठी केले येणे ?

काय पुन्हा इच्छा झाली
येथे मांडावे गोकुळ
थोडा मौजेने करावा
नंद–यशोदेचा छळ !

विटेवरी तिष्ठुनिया
काय शीणभाग आला,
येतो संसारी हिंडून—
सांगितेल रुक्मिणीमां ?

माझ्या गोवळयाच्या घरी
एक धन्य केली कूस,
काय खेळून-रांगून
पुन्हा मारायाचा कंस ?

-बाळा, लौकरी व्हा मोठे
पृथ्वी दुःखिता अजून
कंस-चाणूर छळिती
दुःख गिळिते जळून

बाळा, लौकरी व्हा मोठे
कशी बांधू मी शिदोरी;
प्रेमकाल्यावीण दुजे
काही नाही नंदाघरी !

## घर, देव, आणि गगन....

घर छोटेसे असे तसे--
चार भिंतींचे, आडोशाचे,
गज असलेल्या खिडकीचे
खिडकीवरील पडद्यांचे...
घर,–रुसणारे, रागावणारे
चिडणारे कुढणारे अन्
" वत्सासाठी पान्हा–धेनुवेचे चित्ती "
ऐसे आम्हांसाठी व्याकुळणारे—
आमचे आम्हां एक ' घर ' लागते !

--नित्य, सकाळी
चाकरीसाठी निघण्याआधी
( वाईत पादत्राणे काढून )
' दोन्ही कर ' जोडण्यापुरता
वाटेत उभा
चैतन्याचा लावण्यगाभा,
नटलेला सजलेला,
आम्हां मनी पटलेला
आम्हांस आमचा एक देव लागतो !

—त्रिभुवनाचे छत्र बनून
साही ऋतूंना खेळवणारे,
गरजणारे–बरसणारे,
तारकांसोबत जागणारे
उषा-संध्या रंगविणारे
चंद्रसूर्यांच्या दोन नेत्रांनी
मायापाखर घालणारे
शुचिर्भूत, घनश्याम...,
आशीर्वचन देणारे,
अपराधी मनांना आमच्या
अर्ध्या रात्री कुरवाळणारे
आमचे आम्हां एक गगन लागते !

—घर, देव आणि गगन
यांच्या साक्षीत अवघे जीवन
विकळ, विव्हळ तरी उजळ
उचंबळते, उचंबळते
आम्हा कवेत घेऊन जाते !

## ही ललित लहर

हे फूल उमलले दिसते गोजिरवाणे
माझिया जिवाला घाली गोड उखाणे !

या प्रखर उन्हाचा नाही ठावा ताप
हे प्रभातरंगी खुलते आपोआप !

पाकळी गोजिरी याची थरथरणारी
दवबिंदु झेलिता होते गोरीमोरी.

आतल्या आत जो गंध याचिया दाटे
तो उमलायाच्या आधिच जीवा भेटे

या वाटे– " माझ्यासाठी जग हे नटले,
हे सोनकिरण मजसाठिच की प्रगटले !

मी मान झुकविता तिकडे यावे यांनी
या मातीवरच्या मातीच्या पुतळ्यांनी "

– कुणि म्हणा हवे ते – मी तर झालो वेडा!
फुलगंधाने मम मना घातला वेढा !

ही ललित लहर – हा बहर आगळा वाटे
मज मानवास अजि उर्वशीच की भेटे !

## कार्तिकाच्या रात्री ...

ही कार्तिकाची मधुरात्र आहे
वारा कसा आज सुखात वाहे :
पृथ्वी सखी उल्हसिता बघून
हा चंद्रही धुन्द फिरे वरून !

अंबेबनातुनि, कुठूनि, किती दिसांनी
येई प्रिया, सभय हात धरी हसोनी,
' तेव्हापरी ' फिरुनि आज बनूनि बाला
सारीतसे कितिकदा तरि कुन्तलाला !

वाऱ्यासवे बट हलेच, विमुक्त होत,
की प्रश्नचिन्ह हृदयामधले अनुक्त !
हो अंगस्पर्श मधुनी, मिठिहून गोड;
नेत्रांत गूढ तरळे कसले प्रगाढ !

—मी ते सखीमुख बघे कितिदा वळून
की पुण्यसंगम तिथे उसळे जुळून...
ते हास्य, ते अनघ लाघव वेड लावी
मी साठवू किति, कसे प्रियचित्र जीवी !

अंबेवनात लवल्या मिसळून शाखा
होती पुन्हा अलग...कंपित या अशा का ?
ही एक ' साउलि ' खुळी बिलगे पदाशी,
चंद्रा गड्या ! तिजशि का वद दूर नेशी...

ही कार्तिकाची मधुरात्र आहे
वारा कसा धुन्द सुखात वाहे--

## पहाटेच्या प्रहरात

पहाटेच्या प्रहरात
जाग आली कोंबड्याला
बांग दिली जगताला.
पहाटेच्या प्रहरात
बाळ वळले कुशीला
पान्हा मुखात सांडला.
पहाटेच्या प्रहरात
अर्ध्या-उघड्या नयनी
झाली साखरपेरणी !
पहाटेच्या प्रहरात
त्याच्या पुष्ट दंडावरी
कुणी शाल हळू सारी.
पहाटेच्या प्रहरात
एक बावरी पहाट
प्रकाशाला बिलगत !

## सांगता

—तू प्रसन्ना, तू प्रशान्ता
देउळाची साउली,
अंगणी माझ्या अभागी
येउनी का राहिली ?
—कमलिनी तू , तू उषा
अन् तूच अंत:प्रेरणा;
तूच साक्षी दीप माझ्या
तिमिरभरल्या जीवना.
—वासनेचा दारवंठा
पाय माझा सोडिना,
क्षितिजरेषा दाविसी तू
आत्मभोगी या मना !
—चालवाया नाव माझी
पुण्य तुझे अर्पिशी,
प्रीतिच्या दैवी ऋणाची
सांगता होई मनाशी !

वेल

दारात कसा तुझ्या, गडे,
जाईचा हा एकच वेल
एवढी झाडे सृष्टीमधली...
    त्यांचे तुला भान नसेल ?
दहापाच पांढरी फुले
तेवढीच तुला पुरेत का ?
अर्धमिटल्या खिडकीचे गुज
    त्यांच्याशीच बोलतेस का ?
किती ग्रीष्मांचे ऊन फिरले
तुझा वेल सदा हिरवा
मला वाटते– याच्या मुळाशी
    देवाघरचा झरा असावा !
तुझ्या दारावरून जातो
तेव्हा आगळा सुगन्ध येतो
सांगशील काय कधी मला
    वेल कशाने शिंपलास तो

## नाते

तू खुशीत असतोस, तरीही
माझी पापणी भरून येते—
असे कसे जडले आहे
बाळा, तुझे माझे नाते !

सर्वस्वाचा आधार घेऊन
तोल सांभाळीत असतो;
डगमगणाऱ्या काठीवर
तुझे राजस रूप पेलतो !

—तरीही पण अचानक
कुणीकडेच झुकता काठी,
तूच हृदयान्तरी म्हणतोस—
" मी आहे तुमच्यापाठी ! "

असे कसे जडले आहे
बाळा, तुझे माझे नाते
जन्मान्तरीचे पंख घेऊन
जे झेपावत येते !...

# भर दुपारची वेळ

“ भर दुपारची वेळ
बाळा, घरातच खेळ
गोरे गोरे तुझे अंग
उन्हामध्ये करपेल !

चल घरात खेळाया
तुला देते गोड खाऊ,
चित्रे पुस्तकामधली
चल दोघेजण पाहू.

उन्हामध्ये चेंडूफळी
तुझी सारखी चालली
बॅट पेलेना मुठीत
ऐट ‘ बोर्डे ’ची आणली !

बाई उन्हात पळून
पाय छोटे पोळतील
तेल लावता लावता
हात माझे दुखतील.

आता ऐकतोस, किंवा
‘ त्यांना ’ सांगेन येताच... ”

“ त्यांना म्हणजे कुणाला ? ”
बाळ बोलला हळूच.

–“ त्यांना म्हणजे त्यांनाच ! ”
माता बोले ठसक्यात
आणि घेतला मुलाचा
गालगुच्चा उगाचच !

साउलीत माउलीचे
मुख गोरेमोरे झाले,
चला, रसिका पहाया
उन्हातली लाल फुले !

## चित्रा

स्वच्छ चैत्राचे गगन
उभा चेहरा उजळ,
दोही डोळियांभीतरी
एक हास्याचे काजळ !

कानी डुले कर्णफूल
धन्य गालांचा प्रदेश;
कुण्या अज्ञात लोकीचा
मस्तकात भिने वास... ?

व्यस्त चंचलपणाला
घातघातला आवर
आटोपेना वेडापिसा
असा स्वछन्द पदर !

आता, पहिल्या प्रहरी
फुले फुलती चाफ्याची
तीच इतुक्या घाईने--
आहेत का वेचायची ?

—पानझडल्या जगात
चाले कुन्तलस्वामिनी,
दृष्ट लागेल दृष्टीला
नये पाहू निरखूनी !

—देणे

फूल अर्धे उमलता
कधी कोणी पाहिले का ?
त्यांनी जाणिली असती
हिच्या लावण्याची लंका !

काही बिकट उत्कट
अशी लवणारी तनु
भोळेपणा मिरविते
वेडीबागडीच हनु !

ओठाहूनही बोलके
एक नयनाचे पाते,
मीन चंचल डोहात
जळ काही उसळते !

—रसरशीतपणाचे
भुऱ्या ओंजळीत दान;
पक्षपात असा देवा
दिसे तुलाच शोभून

असे नव्हाळीचे देणे
देशी त्याला देशी किती
खरे तुझ्या औदार्याला
नाही मिती......नाही मिती !

* *

## उखाणा !

मनगटावरी खेळे तांबडी बांगडी
लांबट नखांशी मेंदीची लबाडी--

पावले आरक्त लोभस तेवढी
ओठाशी चुरल्या डाळिंबाच्या फोडी !

कपाळीची बिन्दी उमटली लाल
गालांच्या प्रदेशी सांडला गुलाल

देव रचिताहे जुळवीत खुणा
कुणासाठी तरी हा लालट उखाणा ?

* *

## माझ्या मना रुसू नको

माझ्या मना रुसू नको !
सकाळपासून बोलत नाहीस
आज तुला झाले काय ?......

... ... ...

— कुणाच्या अनावर जिव्हेचे
संगीनपाते
तुला चाटून गेले काय ?
—कुणी कंगाल
मत्सरदृष्टीने
तुजकडे खोचून पाहिले काय !
—की मजवरच रागावला आहेस ?
— एरव्ही, एखाद्या
कॉलेजकन्येच्या जिभलीसारखी
सारखी तुझी चालते गडबड,
बडबड !......
त्याच किरणशलाकांवर
आमचा दिवस फुलत असतो
हे तुला माहीत नाही ?
पावसाळ्यातल्या दुर्दिनासारखा

असा उगाच रुसू नको;
हृदयाच्या कोपऱ्यात बसू नको!

... ... ...

तुझ्या सोबत अजून मला
किती वळणे चालायचे आहे;
जनन-मरणाचे सुखदुःख
एकाच जन्मी भोगायचे आहे :
--सुख पाहून हुरळावे,
दुःख देखून विरघळावे,
जळून नव्याने जन्मावे,
असे आमचे चालले आहे;
त्यात एक बरे आहे
तुझी हुशार सोबत आहे!

... ... ...

पण तूच रुसलास तर
आम्ही कोणाशी बोलावे,
खेळावे?
जिंकलेले आणि हरवलेले
डाव कुणाला सांगावे?

--सारे जग रुसले तरी
एक वेळ भिणार नाही
पण तुझ्यावाचून गड्या,
आमचे काही निभणार नाही !
आता--
जरा मोकळेपणाने
मला तुझे हितगुज सांग !
तुझा दूर करीन राग !
--चल, मुलांच्या मेळाव्यात बसू
त्यांच्यासंगे थोडे हसू !
—नाहीतर असे करू,
थोडे फुलांच्या बागेत फिरू
तिथल्या निर्मळ गर्दीत शिरू !
तिथली गजबज कानी येईल
आणि तुझा रुसवा जाईल :

...   ...   ...

आता ' नाही ' म्हणू नको,
माझ्या मना रुसू नको !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

## लेखणी

माझ्या मुलाची लेखणी
आहे येथे पहुडली
अर्धा तुटका हा टाक
त्याची छोटीशी जिभली !

दौत उघडीच राहे
तिचें उपडे टोपण,
फडफडणारी पानें
स्वस्थ राहिली थकून !

बाळ झोपला तसाच
धडा अर्धा वहीवर;
आता स्वप्नात असेल
रंगलेला छोटा वीर

—आता असेल जाहले
अर्धे शतक काढून
किंवा पतंग कोणाचा
दिला असेल काटून !

आता कोणी वर्गमित्र
गळ्यामध्ये घाली गळा,
कोणी असेल दावीत
चिंच, जांभूळ, आवळा !

आता असेल आईच्या
झोंबाझोंबी पदराशी
तिच्या रागाला लटक्या
कोण हसतो मनाशी ?

—अर्धे विलग हे ओठ
पुटपुटती मधेच,
काय मारितात हाक
' दादा ' म्हणून मलाच ?...

–बाळा, तुला काय हवे ?
दचकसी का झोपेत ?
आहे बरे मी पाठीशी,
माझा उभवीत हात !

पंख दिले तुझ्यासाठी–
देवाने हे मला वाटे,
चोच दिली तुझ्यासाठी–
चारा शोधू कुठे कुठे !

बाळा, झोप रे निवान्त
तुझ्यासाठी माझे बाहू–
आहेत हे बळकट
नको बावरला राहू !

... ...

–तुझी लेखणी ही उद्या
होवो माझ्याहून मोठी,
सांग पुढच्या पिढीला
खोल जीवनाच्या गोष्टी.

माझे अपुरे तुझ्यात
जावो बाळा पूर्णतेला;
समईने ओवाळिले
आज बालसूर्या, तुला !

## भक्तीस तू......

स्टेशनावरी

असाच कुणाला निरोप देण्याला
गेलो होतो रामप्रहरामध्ये...

... ...

चंचल लेकरे, बोलक्या बाया
समर-सैनिक, शेटजी-व्यापारी
पंढरीचे कोणी भक्त वारकरी
सर्वांची दाटी
पंढरीपरी

--निरोपिताला निरोप देऊन
उभा होतो तिथे, तेथल्या लोखंडी खांबासारखाच
तोच
अंजिरी वस्त्र सळसळले--
मागून येऊन कोणी पुढे गेले--
......तरुण उमर
बांधा अटकर, हंसाची रीती
वाटले तूच... ...!

... ...

मला न पुसता माझीच पाउले
बीजवेगाने कशी धावली,
मला न पुसता माझेच नयन
पहात राहिले शृंगारकळी !

--तुझेच हास्य, तुझीच जीवणी,
तुझेच नयन घेऊनिया कोणी...
वाटले तूच......तूच असावीस
—परन्तु नव्हे;
काहीतरी उणे--
अथांग, अवर्ण्य देवाने नेलेले देवाचे देणे
काहीतरी उणे होते तिथे, आणि
नव्हतीस तू !......नव्हतीस तू !......

* *

# तुला कोठे पाहू... ?

रस्त्याच्या कडेला अंध भिकारीण
सकाळपासून :
चिपळ्या हातीच्या थकल्या वाजून
तिची थाळी एका पैशाची भुकेली :
केव्हाचे चालले गाणे ते पुराणे —
' तुला कोठे पाहू ? देवा, तुला कोठे पाहू ? "

... ...

लेकरू शेजारी बसले धुळीत
फुटकी तुटकी थाळी न्याहाळीत :
फाटकी पैरण, पांढरी टोपी,
कोमल मुख, निष्पाप डोळे,
आईच्या अंगाशी खेटून पाहे
सारे भिरीभिरी......
रस्त्याने वाहता मानवांचा लोंढा,
नटवी दुकाने, हॉटेले, माड्या,
धान्याच्या गोण्यांनी वाकलेल्या गाड्या,
जोसात पळत्या मोटारींच्या पाठी;
सिनेमाच्यासाठी उघड्याच पोटी
निघालेल्या बाया......

पाहतसे बाळ सारे भिरीभिरी !
दिस तर आता पश्चिमेला गेला,
गंजल्या थाळीचा ओठही वाळला;
माउलीच्या लेखी दिस बुडालेला
कधीचा— कधीचा— !

अंधार उतरे दिसे ते गिळीत !
स्वर माउलीचा राही उंचावत
तंबोरीची तार पिळीत पिळीत —
‘ तुला कोठे पाहू ? देवा, तुला कोठे पाहू... ’

## अहो, असे झाले कसे ?

अहो असे झाले कसे—
सकाळच्या त्या सगळ्या कळ्या
वेलीवरच झुकून झुकून
अखेर शेवटी सुकून गेल्या........
अहो असे झाले कसे ?
        कळ्यांना तर वाटत होते :
        " तो रोजचा मुलगा येईल
        ओंजळ ओंजळ फुले नेईल,
        एक छोटासा हार करील,
        आणि देवाच्या फोटोला वाहील !
निदान निदान —
स्कर्टच्या घोळात मुसमुसणारी
घुसफुसणारी अलका तरी
इथे एक गिरकी घेईल,
एका फुलाचे सोने होईल :
        वाटत होते
        कमा, मधू, नाना– कोणी
        येतील हांसत रोजच्यावाणी;
        अंगावरून फिरवीत हात

म्हणतील ' वेल डवरली सारी '
(...पण तेही घडले नाही.)
वाटत होते
शेजारचे दादा
डोळे चुकवून बघतील तीनदा,
आणि हळूच मांजर बनून
नेतील आम्हांला खिशात लपवून;
ठेवतील आम्हांला फुलदाणीत
त्यांच्या घरी तर त्यांच्या घरी !
पण अहो, आजच त्यांना
सुबुद्धीने घेरले कसे !
अहो असे झाले कसे.........?
असो : आजचा आमचा दिवस
दिला आम्ही वेलीसाठी :
वेलीसाठीच आम्ही फुललो
तिलाच आम्ही नटवले—सजवले
वेलीच्याच वेणीमध्ये--
आम्ही आज हसत राहिलो !
ती कशी खुशीत होती
वाऱ्याशी नाक घाशीत होती !

—वेलीसाठी हसता हसता
दुपारचे भान उरले नाही
साऱ्या अंगाची झाली लाही !
अहो, आजची ओळखून वेळ
ढगांनी सावली करायची होती
सूर्याने किरणे आवरायची होती;
पण कुणाला कळलेच नाही......
आजच्या सुंदर दिवशी, पण
वेलीला सारे कळले आहे
म्हणूनच ना
तिने आम्हांला
सुकलेल्यांना
अजून उराशी धरले आहे "
...    ...
अहो असे झाले कसे
निर्माल्याला फुटले हसे !

## रिता मंडप

मूर्ती गेली मिरवत
रिता जाहला मंडप,
चहूभवतीचे तेज
मंदावले आपोआप !

धूप, दीप, गंधाक्षता
मंत्रजागर विरले,
ग्रह-नक्षत्रांचे नभ
आता एकाकी उरले !

मिरवणाऱ्या मूर्तीला
आपुली आठवण
असेल का, विचारिते--
अभाग्याचे कष्टी मन...

ज्योतीवाचूनचा दिवा
नाही जिवा पाहवत,
सारे पहावेच लागे
अशी आहे जगरीत !

## धरित्री

धुवांधार पाणी सोंडेने ओतून
'हस्त' परवाच गेला सिरवून
फुलले डोंगर, फुलल्या कपारी;
बगळयांची रांग तळ्याच्या किनारी! १

ओढ्या-ओहळांना उदंड पाणी
पिके दाटीवाटी उभी रानातुनी,
ढग उंचाहून भरल्या दुपारी
देवाच्या दारची चवरी वारी! २

शिवारी खेळतो हिरवा रंग,
उभा पानमळा सावरतो अंग;
केळीला घरचे केळघण झाले
'हळदी'चे अंग सोन्याने माखले! ३

--जाईला जुईला बहर आला
रानी सुगंधाचा फिरला वारा,
पाषाणखंडाला फुटली पालवी
प्राजक्त भूवरी लिहितो ओवी! ४

ग्रंथसंग्रहालय
96308

'मृग' मुठी मुठी गेला निरवून
तेच ओठी पोटी आले उमलून
इंद्रा–वरुणाची लेक आवडती
वैभव लुटिते आज ही धरित्री ! ५

— सारे सभोतीचे इथेच सोडून
वाटे, उंच जावे डोंगरावरती
तेथूनी पृथ्वीला घालावी साद—
"अगे माझे माय, प्रेमळ धरित्री !" ६

"अगे माझे माय, प्रेमळ धरित्री
तुझी ओटी आज फुलली पुरती
समज मजला तुझा एक लेक
आणि घे मलाही पदराखालती ७

पिऊन तुझे ते अमृतस्तन्य
फुटू दे नसात हिरवे चैतन्य
फुलेन, झुलेन—झडेन अंती
माझा देह, माय, तुझीच माती !" ८

* *

## कावड

सारे हे सभोती सुंदर असता
मध्ये उदासता डंख मारी
बुजते मनाची दुःखाची ओळख
ते तो निजसुख दाखवीच
संसाराच्या घरी अशी का ही रीत
मध्येच आघात होत आहे
—भरली कावड खांद्यावरी वाहे
वाट सरताहे रात्रंदिन
वाटेचे मोगरे वाढावे फुलावे
मांडवासी जावे यथाकाल
पानोपानी फूल, फुलांत सुगंध,
दाही दिशा धुंद धुंद व्हाव्या !
भरली कावड हासत मी वाहे
तीर्थ माझ्या राहे संगतीला...

## आम्ही संसारी माणसे

आम्ही संसारी माणसे
आम्हा परमार्थ किती,
सांभाळितो चार भिंती !

स्वार्थ-भरल्या मनात
आमुचीच गातो गाणी,
कधी तुळशीला पाणी...

खऱ्या-खोट्याचा तराजू
नित्य हाती वागवितो
माप झकवू पहातो !

'रंग' खेळून विटता
दीपापाशी, मध्यरात्री
आम्ही वाचू ज्ञानेश्वरी

'तुम्ही' भेटता वाटेत
अशापरी - तशापरी
आम्ही डावलतो, हरी !

बाळरूपे काही काळ
तुम्ही नांदला सांगाती,
तरी आम्हा नाही क्षिती

—आम्ही संसारी माणसे
वाट चालतो चालतो,
जीभ गिळीत बोलतो

दूरवर वळणाशी
उभा दिसताच काळ
मग वडवितो टाळ !

## कृष्णेचे गाणे

प्रातःकाळी आज जाहले दर्शन तव आई
हे कृष्णामाई !
राहिले पर्वतावरती– शंकर,
उतरसी ' वाइ 'चे घाट– झरझर,
छत्रपतींच्या साताऱ्याला उजवे घालुनिया
चालसी कोणा भेटावया !

लोळलो तुझ्या पात्री मी– कितिकदा
पाहिली तुझी सोन्याची– संपदा !
सांगलीसा वैभवे धावलिस भगवे स्वीकारुनी
ध्वजा तू रमलिस राजांगणी

काकड्या मळीच्या खाल्ल्या– चोरुनी
ती गोडि पुन्हा लाभेना–'जीवनी
कवळि मक्याची कणसे ती तर मुखात विरघळली
ती तुझ्या पान्ह्याने पोसली !

लोटता पूर आषाढी– भय जडे
हो अफाट पाणी पाणी– चहुकडे
अंगणदारी माझ्या येउनि रंगण धरिले तिथे
ते मला आठव आठवते

किति मित्र ' राहिले ' माझे– तव तटी
ते कशास आता केव्हा– भेटती !
अनामिकांची कोण कशाला उभविल गे, देउळे ?
जे गेले ते हरपले !

ती दूर अता देशावर– सांगली,
ती कृष्णा पहिली नाही– राहिली,
अडविती, तुला गडे किती बांध बांधोनी
सिमिटाचे तट घालुनी...

मजसाठि मात्र अजुनी तू वाहसी
मी श्रमता श्रमता ऐसा बाहसी !
लाटांचे घालुनी पांघरुण जोजविसी तू मला
पाळणा म्हणसी पाण्यातला
मम वेडेपण अन् शहाणपणही कसे
ते तुला माउली– पुरते माहित असे
आज अचानक म्हणुनि भेटलिस चुकलेल्या बाळा !
वंदितो कृष्णामाते, तुला !

* *

## देव कोठे, देव कोठे....

देव कोठे, देव कोठे ?
चाले मन उफराटे...
शिकविले बालपणी
आईबाप – गुरुजनी,
देव असा, देव तसा;
सारा देवाचाच ठसा !
आणि भक्तिभावे किती
वंदिल्या मी देवमूर्ती !

आज आता मोठेपणी
रंग जगाचे पहाता,
कोठे येईना दिसून
" सारी देवाचीच सत्ता ! "
चाले जग पैशावरी
आणि थोडे सत्तेवरी,
आणि थोडे ढोंगावरी
आणि थोडे ढंगावरी
देव कोठे देव कोठे
चाले मन उफराटे...

— कोणत्याहि मूर्तीपुढे
'बाळ' माझा हात जोडे!
देव कोठे आणि कसा
काय तयाला दाखवू,
देव आहे – देव नाही
काय सांगूनिया ठेवू?
— कसे समजावू त्याला
देव मानवामधले
ज्यांचे राज्य सत्त्वगुणी
माझ्या मनी नित्य चाले

* *

## निवान्त नदीचा काठ

निवान्त नदीचा काठ
एकला स्फुंदतो घाट...

आंदुळे किनारी लाट
भीतरी उदक शान्त

एकच वाकुडे झाड
पाहते पाण्यापल्याड !

पुलाची कमान दूर
सांजच्या स्वप्नात चूर

नादिष्ट बालक कुणी
काठाशी बघे वाकुनी

— दूरच्या होडीत दिवा
उजळी भोतीची हवा

लाटांत उसळे ज्योत
एकाची अनंत होत...

— तशा त्या कातरवेळा
तुझा का आठव आला

क्षणैक दाटून आले,
जाहले नयन ओले

निवान्त नदीचा काठ
एकला स्फुन्दतो घाट...

* *

## ऊठ कोकिळे !

शान्त, सज्जन, प्रेमळहृदयी
रात्र सारी संपत आली...
अजून शुक्र उगवला नाही,
अजून कोकिळा उठली नाही;
'कुहू कुहू'ची पवित्र वाणी
अजून हृदयाने ऐकली नाही !
ऊठ कोकिळे, लौकर ऊठ
तुझी अमृतवीणा ऐकून —
चित्त माझे उमलू दे,
पूर्ण फुलू दे...
लौकरच रोजचा सूर्यदेव येईल
उगवल्या चिंतांचे गाठोडे घेऊन
दारासमोर उभा राहील !
प्रिये कोकिळे,
लौकर ऊठ
दूर हिरव्या झुबक्याआडून
पहाटेच्या दैवी प्रहरी
आत्म्याला हाक मारीत रहा,
शुक्रताऱ्याच्या पवित्र साक्षीने
त्याला क्षणभर 'जागवीत' रहा !

# रंग

रंग दिवसाचे बद्लत जातात
शेवटी संध्यारंग दिसतो,
तापलेल्या जीवाला माझ्या
माहेराचा मार्ग भेटतो !
जीवनात आकंठ बुडताही--
मी स्वतःशी परित्यक्त,
आत्मनस्तु कामाय ... कामाय सर्वे
या मंत्राचा अखेरी भक्त
उदंड मायेच्या ऊबदारीत
जीव बावरला का असतो ?
किरण देवाचा भेटेल केव्हा
म्हणून वेगळी कळ सोसतो ?
नाना रंग पेहरले तरी
आत भगवा रंग आवडतो,
सात समुद्र फिरणाऱ्याला
क्षितिजापल्याडचे स्मरण देतो !

## विसावा

सूर्य मध्यान्हासी आला
चकाकत, लखाखत;
वसुंधरेच्या घराचे
दिशाकोन उजळीत... १

--केला प्रवास दूरचा
भल्या पहाटे उठून
गोष्टी सांगत आपण
आलो घाट ओलांडून ! २

तुडविल्या जंगलाची
वाट राहिली मागुती
वडाखालची विहीर
दिसे नयनांपुढती ३

शिणले ते सोडू बैल,
त्यांना घेऊ दे विसावा,
पाटाजवळी पाण्याची--
थंडगार सुटे हवा ! ४

सोडा शिदोरीच्या गाठी
घास घ्या रे अमृताचे,
प्रवासाच्या आठवणी
रंग-प्रसंग रुचीचे

असो आम्हांला सोबत
भगवंत मागेपुढे,
जरा सूर्य कलताच
गाड्या जोडू शिवेकडे !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ...................... दि: ......................
......................... नों. दि: ......................

‘ कर्वे रोड ’...

खांद्यावरती कधी घेउनी धान्याचे पोते
या रस्त्याने वंद्य महर्षी कर्वे चालत होते !

मनात होती अनाथ स्त्रीच्या कारुण्याची कथा,
काढायाची होती वरती बुडलेली ‘ गाथा ’ :

त्या चरणांना सदैव होती हीच वाट ठावी
त्या श्रवणांनी एक ऐकिली दुबळ्यांची ओवी

पहात होते वृक्ष बाजुचे भरल्या नयनांनी
ढाळित पाने कधि प्रेमाने माना झुकवोनी

नदी बाजुची प्रतिदिन पावन, क्षाळुनि त्या चरणां
अश्रू पुसले किति नयनींचे, तिलाच ठाउक ना !

...        ...

--या रस्त्याने येरझार तो करित श्रमला पिता,
धुळीतल्या पादुका दिसति मज कितीकदा आता...

मला वाटते,-- या रस्त्याला नमने वाहुनि चालावे
वन्दन-ओवी मुखी प्रगटता धन्य स्वरांना वाटावे !

# मागे वळून पहा जरा

तू असा धावणारा
        धावणारा,
मागे वळून पहा जरा!

...        ...

मागे, मागे,
तुझ्यासंगे
ही देवतारूप सुंदरा
धावत आहे तुझ्यासाठी,
तुझा पुढे पुढे ' मोहरा '...
मागे वळून पहा जरा!

...        ...

शालीन मुद्रा, सज्जन वेष,
नेत्रांत फुलता अभिमान रे;
        रथचक्र सांभाळणारी,
        रथामध्ये लपणारी,
        रथाबरोबर फिरणारी— झरणारी
हिला विसरशील मुशाफिरा,
मागे वळून पहा जरा!
...        ...

तुझे पंख उंच जाता
ही अंतरात
लवलवत असते;
‘ सांभाळ देवा, पांखराला ’
हेच मनाशी जपत असते;
त्या त्रिभुवनसुंदराला
एक आरती गात असते
“ याचा यज्ञ पुरा करा ! ”
मागे वळून पहा जरा

... ...

मेघ बनून गगनातला
ही सावली धरीत असते,
तू तापताच, धार बनून
सर्वांगी रे तुझ्या बरसते !
रक्तमाखला तुझा हात—
विजयध्वज मिरवीत येताच
ही अक्षता होऊन उधळते...
त्या तांदुळांनी लवते धरा !
मागे वळून पहा जरा !

* *

## सूर्य पश्चिमेला गेला....

नित्यकर्म आटोपून
सूर्य पश्चिमेला गेला,
त्याचा आजचा प्रवास
फार फार कष्टी झाला !

--आज आमच्या सूर्याला
फार ढगांनी छळले,
उमलत्या कलिकांशी
नाही नाही बोलू दिले...

बालकाच्या पाळण्याशी
नाही रेंगाळता आले,
स्नात पुरंध्रीचे हात
जोडलेले ना देखिले

—सारा दिवस ढगांची
भिंत भिंत उभी होती
प्रियदर्शनाशिवाय
पृथ्वी कोमेजली होती !

आज नदीतले पाणी
खिन्न मूक उभे होते,
वाट पाहून थकले
पक्षी बोलत नव्हते

—भिजलेली गरीबाची
वस्त्रे नाहीत वाळली
याची आमच्या सूर्याला
फार फार खन्त झाली !

—आज वृष्टीत न्हालेली
उद्या हसेल धरणी,
तिला धरील पोटाशी
मित्र आमचा हा गुणी

परी आजचा प्रवास
कसा कष्टी कष्टी झाला,
वाट काढीत अंधारी
देव पश्चिमेला गेला !

## वटवृक्ष

वृक्ष वडाचा
        अवध्या रानी, भरल्या नयनी पाहत आहे !
शाखांचा विस्तार सभोती
वेडा-बगडा उभाच आहे !
        पंख ऋतूंचे घेउन, पक्षी
        कालाचा येथेच थांबतो;
दूत प्रभूचा—
        किरणे याच्या चरणांवरती
        अर्पुनि नंतर पुढती जातो....
—पुष्ट कळप गायींचा केव्हा,
बाल गुराखी-मेळा केव्हा,
सायंकाळी
आणि खगांचा जथाच केव्हा
याच्या खांद्यावरी विसावुनि
याच्या छायातळी विरमुनी
        वाट उद्याची पुढे चालतो !...
—हा प्रतिपाळी अवघे रान
' कर्मवीरां 'परि प्रेमळ होउन,
        वृक्ष पुरातन
        शतशाखांनी– पारंब्यांनी—

शतंजीव झालेला वामन !
शान्तिदेव वा, क्रान्तिदेव वा,
यज्ञपुरुष संतोषविण्याला, हवेच याचे हिरवे पान;
समिधा याच्या हव्यात– व्हाया, यज्ञाग्नीचे रूप ज्वलन्त !
—हा तर येथे
उभाच आहे
उदार हस्ते द्याया जे जे वांछित,
दूर कराया मानव–लांछित...
—हाच झेलतो
विश्वकुलाच्या प्रलयंकाळी—
बुडत्या देवा
वटपत्राचा आश्रय देऊन;
नवविश्वाच्या सृजनासाठी
सांभाळीतो
एक अंगठा चोखत पडले
बाळरूपडे ! ...

## जीवनसाथी

खेळ असा असावा—की
देहभाव हरपून जावा;
मेळ असा जमावा—की
मीलनात स्वर्ग दिसावा !

जीवनसाथी असा असावा--की
प्रतिक्षणाला साद मिळावा,
दोन जीवांच्या एकदृष्टीत--
सुखदु:खांचा भोग मिटावा !

बाळ असा असावा—की
दहा पिढ्यांना दिवा दिसावा,
मानवतेची करून भक्ती
कोटिकुळाचा उद्धार करावा

देव असा असावा--की
त्याचा अभयहस्त दिसावा,
अंतरीच्या विटेवर
ओवाळिता- आलिंगिता यावा !

## दगडाचा जन्म जरी—

दगडाचा जन्म जरी लाभला स्वभावे
देवा, तुझ्या दारीची मी दीपमाळ व्हावे !
ज्योत विझू आली तरी तेज ना सरावे
गीत गाता ये ना तरी स्वर असू द्यावे !
जड झाले ओझे माथा जरी ना पेलवे
तरी संतांघरी माझे पाउल पडावे !
झगमग नगरात जळू देत दिवे
मला समईसमीप मूक बसू द्यावे !
—दगडाचा जन्म जरी लाभला स्वभावे
देवा तुझ्या दारीची मी दीपमाळ व्हावे
कधी तरी कोणी तरी लावीलच दिवा
देवा, तुझ्या मुखी माझा किरण पडावा !
किरणांत सुवर्णाची होईल ही काया
पैलतीर पाहीन मी विसरून माया !

## सांभाळा ही वीणा

बाळराजे, पहाटवेळ झाली !
'रात्रभर' आम्ही पहारा केला
आता ही वीणा आमच्या हातांनी
तुमच्या गळयात घालू द्या;
उभा जन्म
उन्हापावसात
जीवाभावाने सांभाळीत आणली आहे !
—ही वीणा
कवित्वाची
कर्तृत्वाची
भोक्तृत्वाची
तुमच्या गळयात घालू द्या
तुम्हांला डोळेभर पाहू द्या !

डोळयांतील अश्रु पुसण्याआधीच
त्या सदय अश्रूंनी—
आमची वाट
अंधुक अंधुक होण्याआधीच
आम्हांला पुढे वाट चालू द्या
ही वीणा
तुमच्या गळयात घालू द्या !

राजे हो--
तुम्हांला आम्ही वाढविले हाता-खांद्यावर,
चोवीस तास
हृदयीच्या अंगणामध्ये
घेऊन फिरलो तुमची मूर्ती !
--इतकी वर्षे
डोईवर फिरली :
तुमच्या संगेच सारी जत्रा
पहात फिरलो;
आम्ही तुमचे बोट धरले होते
की, तुम्ही आमचे धरले होते
उमगले नाही
    आता आमचे बोट धरून ठेवा
    म्हणेपर्यंत, म्हणेपर्यंत--
    "आमचा राम राम घ्यावा !"
...आम्ही बरोबर घेऊन आलो
सज्जनांची प्रीती, श्रीहरीची भक्ती;
पंढरीची वाट
आमच्या घरासमोरून
रोज देवाला जात होती :

--ही माळ साक्षी ठेवा!
आम्ही जोडले गावोगाव सोयरे
त्यांच्या उराउरी भेटी- नेत्रांतील पाण्यात
भिजलेल्या
आम्ही कधी विसरणार नाही :
--तुम्ही त्या पुढे चालवा!
आम्ही बांधले सात्त्विकाचे घर
भलेपणाच्या पायावर,
भल्याभल्यांची पायधूळ झडते आमच्या घरी :
--ती तुम्ही कपाळी लावा!

देव तुम्हांला औक्षवंत करो
बलवंत करो
कुलवंत करो
--आमचा पहारा संपत आला
म्हणवले तसे आम्ही 'हरिनाम' म्हटले,
देवाच्या शत्रूंना निर्भय हटकले :
चंद्रभागेच्या काठी आमचे एक
पाऊल उमटले
त्याचीच एक आठवण ठेवा!

--राजे, आता सन्मुख रहा, सुखरूप रहा !
आमचेच रूप तुमच्या डोळ्यांत
निर्भरतेने पाहात पाहात
खांद्यावरची ही लाडिक वीणा
आता तुमच्या गळ्यात घालू द्या,
श्रीहरीच्या मूर्तीसमोर
तुमचे चरण नित्य चालू द्या,
नित्य चालू द्या !

* *

## वाटचाल

अष्टमीच्या कोरीपाशी
थांबणाऱ्या माझ्या ' मी 'ला
आलो रात्र जागवीत
पहावया उषःकाला !
किती स्वप्ने उणी-दुणी
एका भोगिली जीवनी;
पराभवाच्या यातना
कधी विजयाच्या खुणा
रक्ताळल्या हातांतही
कधी सांभाळला ध्वज
घरकुलाच्या अंगणी
कधी भोगिले साम्राज्य !
' जग जिंकूनिया झाले '
असे माझे मन भुले,
अन्तरीचा कोणी म्हणे—
' माझे ' ओठ तहानले...
आता उरल्या वाटेने
करू त्याच्यासाठी काही,
तेजासाठी चाले त्याला
आशीर्वाद नभाचाही !

## तशी ती

श्रावणात केवडा उमलावा
तशी ती
त्याच्या मार्गावर अगलद
उमलली,
गंधाने भारीत अवघे रान
सुवर्णमाया मिरवीत गेली !
पानापानाच्या अंगांगी
सुवासाची नुसती उधळण
झोक्यावरून फिरले मन !...
सरता श्रावण—
गेला सरून
त्याला इथेच असा विसरून :
आताही तो
जपत आहे
एक सुकले पिवळे पान
ओल्या गंधाने निथळणारे
केवळ केवळ
त्याच्यासाठी !

## प्रश्न

दारात सदाफुली लावून
सगुणपूजा केली नाही,
निर्गुण तर समजले नाही;
देह हातात आला नाही
आत्मा तर दूरच राही
—खेळ खेळून झोपते बाळ
तसेच संपेल जीवन हेही ?

## मरणालाहि दुःख फुटावे

संथ तळ्याचे पाणी
बघते झाड त्यात वाकोनी
उंच नारळीचे,
ठाव काढिते निश्चलतेचा,
तसेच काही हृदयी, हृदयी...
—दिवस आजचा
खोल तळाला
रुतवी भाला हा दुःखाचा !

... ...

तो शान्तीचा महान यात्रिक
सत्याचा, सत्त्वाचा पाइक
यात्रेला जो गेला
तो तर परतुनि नाही आला
लालबहाद्दुर या राष्ट्राचा –

... ...

मूक मिरवणुक
मनात माझ्या शत दुःखांची;
कधी पाहिली नव्हती मूर्ती
त्या वीराची,

REFBK-0016307

मनात करितो लाख वंदने
या शब्दांची जुळवित ओंजळ –

...        ...

एक दिवस हा– त्याच्यासाठी
एक अश्रु हा मानवतेचा
त्याच्यासाठी –
गंगेचीही मिटे पापणी
क्षणभर असुच्या नेत्यासाठी

––असे जगावे, की जगण्याने
मरणालाही दुःख फुटावे !

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
काव्य
मराठी ग्रंथ संग्रहालय
18307